।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

Phone: (02462) 215294 **EXAMINATION DEPARTMENT** **Website: srtmun.ac.in**

email : directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा/वाणिज्य/२०२६-२७/९९०८ दिनांक : २१/११/२०२६

प्रति,

मा. परीक्षा केंद्रप्रमुख, / मा.प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : एक किंवा दोन ठिकाणी चालणा-या अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तीकांच्या मूल्याकांनाबाबत.

महोदय,

दिनांक १७/११/२०२६ पासून प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या हिवाळी - २०२६ च्या परीक्षा सुरु झालेल्या आहेत. तसेच दिनांक ०१/१२/२०२६ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु होणार आहेत. सदर परीक्षेतील उत्तरपुस्तीकांचे मूल्यांकन हे ऑनलाईन पध्तीने होणार आहे. त्यामुळे परीक्षा केंद्रावरून सर्व उत्तरपुस्तीका स्कॅनिंगसाठी प्रस्तुत विद्यापीठात पाठविण्यात येतात. त्यास अनुसरून आपणांस कळविण्यांत येते की, **जो अभ्यासक्रम एक किंवा दोन महाविद्यालयातच चालतो अशा अभ्यासक्रमांचे मूल्यांकन हे ऑनलाईन पध्दतीने होणार नाही. त्यामुळे अशा अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तीका स्कॅनिंगसाठी प्रस्तुत विद्यापीठात पाठवू नयेत.**

जो अभ्यासक्रम एक किंवा दोन महाविद्यालयातच चालतो, त्या अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तीकांचे मूल्यांकन हे तो अभ्यासक्रम ज्या महाविद्यालयात चालतो त्याच महाविद्यालयाकडून ऑफलाईन पध्दतीने करून घ्यावयाचे आहे. त्यामुळे अशा अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तीका विद्यापीठाकडे न पाठविता, तो अभ्यासक्रम ज्या महाविद्यालयात चालतो त्या महाविद्यालयाकडेच पाठवावयाच्या आहेत, किंवा त्या उत्तर पुस्तीका ते महाविद्यालय, संबंधित परीक्षा केंद्रावरून घेवून जातील व त्या उत्तरपुस्तीकांचे मूल्यांकन ऑफलाईन पध्दतीने तातडीने पूर्ण करून गुणयाद्या व तपासलेल्या उत्तरपुस्तीका प्रस्तुत विद्यापीठातील केंद्रीय मूल्यांकन केंद्रात खास दुतामार्फत पाठविण्यांची व्यवस्था करावी, ही विनंती.

तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तीका देखील विद्यापीठाकडे न पाठविता. त्यांच्या उत्तरपुस्तीकांचे मूल्यांकन त्याच महाविद्यालयामार्फत ऑफलाईन पध्दतीने पूर्ण करून तपासलेल्या उत्तरपुस्तीका व गुणयाद्या खास दुतामार्फत प्रस्तुत विद्यापीठातील केंद्रीय मूल्यांकन केंद्रात जमा करण्यांत याव्यात, ही विनंती.

प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :
१) मा.कुलगुरु महोदय, मा.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्र.कुलगुरु महोदय, मा.प्र.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.संचालक, मूल्यांकन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.